

काजू उत्पादनाला लवकरच अच्छे दिन येणार
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



लखनऊ पराभवाचा वचपा काढणार ?
पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, २२ एप्रिल २०२५ I पाने ४ I ₹ ४

I REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 I Volume 13, Issue 229 I Verna, I facebook.com/dainikherald I Tuesday 22 April 2025 I Pages 4 I ₹ 4

## निवडक

### इस्रोला दुसऱ्यांदा डॉकिंगमध्ये यश

**श्रीहरीकोटा, दि. २१ :** इस्रोने पुन्हा एकदा अंतराळात एक मोठी कामगिरी केली आहे. इस्रोने त्यांच्या स्पाडेक्स मोहिमेअंतर्गत दोन उपग्रहांना एकमेकांशी जोडण्यात यश मिळवले आहे. विज्ञान तंत्रज्ञान, अणुऊर्जा आणि अंतराळ विभागाचे राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी एक्स पोस्टवरून ही माहिती दिली आहे. केंद्रीय मंत्री म्हणाले की, हे अभियान अंतराळ तंत्रज्ञानातील भारताच्या स्वदेशी क्षमतांचे एक महत्त्वाचे उदाहरण म्हणून उदयास आले आहे. प्रत्यक्षात, इस्रोने ३० डिसेंबर २०२४ रोजी पीएसएलव्ही– सी ६०/एसपीएडीईएक्स मोहीम यशस्वीरित्या प्रक्षेपित केली. उपग्रहांचे पहिले डॉकिंग १६ जानेवारी रोजी सकाळी ६:२० वाजता झाले. त्यानंतर १३ मार्च रोजी सकाळी ९:२० वाजता ते यशस्वीरित्या अनडॉक करण्यात आले.

-----------------

### जम्मू– श्रीनगर महामार्ग दुसऱ्याही दिवशी बंद

**जम्मू, दि. २१ :** रविवारी जम्मू आणि काश्मीरमधील रामबन जिल्ह्यात ढगफुटी आणि भूस्खलनामुळे परिसरात प्रचंड हाहाकार माजला. यामध्ये ३ जणांचा मृत्यू झाला. पोलिसांनी सुमारे १०० जणांना वाचवले. सोमवारीही रामबन परिसरात बचावकार्य सुरू होते आणि घरे आणि रस्त्यांवरून ढिगारा काढण्याचे काम सुरू होते. तथापि, जम्मू श्रीनगर महामार्ग (एनएच–४४) दुसऱ्या दिवशीही बंद राहिला. यामुळे शेकडो ट्रक आणि वाहने वेगवेगळ्या ठिकाणी अडकली आहेत. यामध्ये हजारो पर्यटकांचाही समावेश आहे. त्याचवेळी, खराब हवामान परिस्थिती आणि अचानक आलेल्या पुराचा धोका लक्षात घेता, रामबन जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालये आज बंद ठेवण्यात आली आहेत.

-----------------

### छत्तीसगडमध्ये स्फोट ;जवान शहीद

**छत्तीसगड, दि. २१ :** छत्तीसगडमधील विजापूरमध्ये नक्षलवाद्यांनी केलेल्या आईडी स्फोटात सशस्त्र दलाचा एक जवान शहीद झाला. मनोज पुजारी (२६) असे शहीद जवानाचे नाव आहे. तोयनार ते फरसेगढ दरम्यान मोरमेड गावातील जंगलात हा सोमवारी हा स्फोट झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तोयनार ते फरसेगढ दरम्यान रस्त्याचे बांधकाम सुरु आहे. या रस्त्याच्या सुरक्षेसाठी सीएएफ बटालियनच्या जवानांना गस्तीवर तैनात करण्यात आले होते. यादरम्यान सीएएफच्या १९ व्या बटालियनचे जवान मनोज पुजारी यांचा नक्षलवाद्यांनी पेरलेल्या आईडी बॉम्बवर पाय पडला. यामुळे बॉम्बचा स्फोट झाला आणि यात मनोज पुजारी शहीद झाले.

-----------------

### राहुल गांधींना १० दिवसांची मुदत

**नवी दिल्ली, दि. २१ :** लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या हिंदुस्थानी नागरिकत्वाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सोमवारी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठात सुनावणी झाली. राहुल गांधी ब्रिटिश नागरिक आहेत की, नाही यावर उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला १० दिवसांत उत्तर देण्यास सांगितले. या प्रकरणाची पुढील सुनावणी ५ मे रोजी होईल. राहुल गांधींवर दुहेरी नागरिकत्व असल्याचा आरोप आहे आणि हा प्रश्न अनेक वर्षांपासून चर्चेत आहे.

### हवामान

कमाल : ३३ किमान : २५
आर्द्रता : ७२

### बाजार भाव

सोने : ₹ ९९,२०० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ १,१,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७९,३६५ .७७↑ (३१.१६ )
निफ्टी : २४,१२५.३० ↑ (८३.९५)

# 'आम्हाला बायपासच हवा' ; भोमवासीय मागणीवर ठाम

## एकाही मंदिराला धोका नाही : मुख्यमंत्री

## केवळ २५ मीटर रुंदीचाच होणार फ्लायओव्हर : भोममध्ये आज होणार हायवे सीमांकन

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पर्वरी, दि. २१ : प्रस्तावीत हायवेला विरोध करणाऱ्या भोमवासीयांनी सोमवारी झालेल्या मुख्यमंत्र्यांसोबतच्या चर्चेनंतरही आपली बायपासची मागणी कायम ठेवली आहे. या हायवेमध्ये भोममधील केवळ चार घरे बाधीत होत असून अन्य कोणत्याही बांधकामाला जराही धक्का लागत नसल्याची खात्री मुख्यमंत्र्यांनी प्रस्तावित हायवे आराखडा सादर करून भोमवासीयांना दिली. मात्र, यावरही भोमवासीयांचे समाधान झाले नाही. पीडब्ल्यूडीच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गावात येऊन हायवेच्या सीमा कुठे येतात त्याचे मार्कींन्ग केल्यानंतरच आणि आम्हाला सरकारकडून तशी लेखी खात्री मिळाल्यानंतरच आम्ही आमची पुढील भूमिका स्पष्ट करू, असा पवित्रा भोमवासीयांनी घेतला आहे. भोमवासीयांच्या या मागणीला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून पीडब्ल्यूडीचे अधिकारी मंगळवारी गावकऱ्यांना सोबत घेऊन हायवेच्या सीमा निश्चित करणार आहेत.**

> भोम गावातून ६० मीटर रुंदीचा हायवे जाणार आहे, अशी चुकीची माहिती गावकऱ्यांना कुणीतरी दिली असून त्या ठिकाणी फक्त २५ मीटर रुंदीचा फ्लायओव्हर प्रस्तावित केला गेला आहे. यामध्ये केवळ चार घरे बाधित होणार असून त्यांचे आर्थिक नुकसानभरपाईसह योग्य पुनर्वसन केले जाईल. या व्यतिरिक्त एकही घर किंवा मंदिर बाधीत होणार नाही. या फ्लायओव्हरची हद्द निश्चित झाल्यावर गावकऱ्यांचे सर्व गैरसमज दूर होतील.
> **- डॉ. प्रमोद सावंत, मुख्यमंत्री**

> मूळ आराखड्यात आधीच दोन पर्यायी मार्ग दाखवण्यात आले आहेत. आम्ही ही बाब मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणली. मुख्यमंत्री या पर्यायी मार्गाबद्दल बोलण्यास तयार नाहीत. आम्हाला बायपास हवा आहे. फ्लायओव्हर नको. २०१० पासून ही आमची मागणी आहे , जी आजही कायम आहे.
> **- किशोर नाईक, ग्रामस्थ**

> गेली अडीच वर्षे आम्ही आंदोलन करतो आहोत. एकही अधिकारी आमच्या गावात फिरकला नाही. आम्हाला हायवे नेमका कुठून जाणार आहे याचा आराखडा दाखवला नाही. १९९९ ला या हायवेचा जर आराखडा बनला असेल तर आम्हाला त्यावेळी जमीन संपादनाच्या नोटीसा का दिल्या गेल्या नाहीत. या सरकारवर आमचा विश्वास नाही. बायपासची आमची मागणी कायम आहे.
> **- पुतू गावडे, ग्रामस्थ**

भोम – अडकोण गावातून जाणाऱ्या पणजी – फोंडा हायवे रुंदीकरणाला विरोध करणाऱ्या भोमवासीयांशी अखेर अडीच वर्षांनंतर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी चर्चा करण्याची तयारी दाखवली आणि सोमवारी मंत्रालयात महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत त्यांची बैठक आयोजित केली. जवळपास ७० भोमवासीय या बैठकीला हजर होते. या बैठकीत भोम गावातून जाणाऱ्या प्रस्तावित फ्लायओव्हरचा आराखडा गावकऱ्यांसमोर सादर करण्यात आला. यावेळी भोमवासीयांनी अनेक प्रश्न उपस्थित केले.

गावकऱ्यांची मुख्य भीती आहे की, या हायवेमुळे गावातील मंदिरे आणि शेती बाधीत होईल आणि गावाच्या संस्कृतिक परंपरा, उत्सव जोपासण्यास बाधा येईल.

पान २ ▶



### काय आहे भोम हायवे विरोध प्रकरण

- मंदिरे उद्ध्वस्त होण्याची भीती असल्याने पणजी आणि फोंडा दरम्यानचा महामार्ग रुंदीकरण प्रकल्पाला भोम परिसरातील जवळपास ३ हजार लोकांचा विरोध.
- भोमचे रहिवासी त्यांच्या ग्रामीण जीवनाशी आणि त्यांच्या संस्कृती आणि अध्यात्माला केंद्रस्थानी असलेल्या चार ऐतिहासिक मंदिरांशी खोलवर जोडलेले आहेत.
- महादेव, नागझरकर, सातेरी आणि सती यांना समर्पित मंदिरे पवित्र मानली जातात, त्यापैकी एक १९ व्या शतकाच्या सुरुवातीचे आहे.
- गावकऱ्यांनी त्यांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे रक्षण करण्यासाठी बायपासची मागणी करत महामार्ग योजनेला बराच काळ विरोध केला आहे.
- सुरूवातीला सरकारने बायपासच्या मागणीला विरोध केला, ज्यामुळे तणाव आणि संघर्षात वाढ.
- २०२२ आणि २०२३ मध्ये मोठे निषेध आणि आंदोलने शिगेला पोहोचली, ज्यामध्ये स्थानिक आणि कला आणि संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांच्यात संघर्ष झाला.
- २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा प्रकल्पांविरुद्ध तळागाळातील प्रतिकाराचे प्रतीक म्हणून भोम आंदोलन उदयास आले.
- खासदार विरियातो फर्नांडिस यांनी भोमचा मुद्दा संसदेत उपस्थित केला.
- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी संसदेत आश्वासन दिले की कोणत्याही धार्मिक स्थळांना त्याचा फटका बसणार नाही, विद्यमान मर्यादेत उन्नत रस्ता ( फ्लायओव्हर ) नियोजित आहे.
- गावकऱ्यांच्या विरोधामुळे ५५७ कोटी रुपयांच्या सुधारित ९.६ किमी रुंदीकरण योजनेच्या या प्रकल्पाची अंमलबजावणी प्रलंबित आहे.

# आधार नोंदणी प्रक्रियेत बनावट पत्त्यांचा वापर

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २१ :** आधार कार्ड अर्ज प्रक्रियेत घरांच्या पत्त्यांचा खोट्या पद्धतीने वापर केल्या जात असल्याच्या वाढत्या तक्रारींमुळे मडगाव परिसरातील रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः स्थलांतरित व्यक्तींकडून बनावट पत्ते, खोटे भाडेकरार आणि चुकीच्या माहितीच्या आधारे आधारकार्ड मिळवण्याचे प्रकार समोर येत असल्याने स्थानिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

फातोर्डा येथील रहिवासी टोनी पिंटो यांनी सांगितले की, आमच्या घराच्या पत्त्यावर कोणीतरी आधार कार्डसाठी अर्ज दाखल केला आहे, ही बाब आम्हाला एका अनोळखी व्यक्तीच्या नावाचे पत्र आल्यावर लक्षात आली. आधार कार्यालयाशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी सदर पत्ता नव्या अर्जात वापरल्याची पुष्टी केली.

अशाच स्वरूपाची तक्रार करताना प्रवीण नाईक म्हणाले, या भागातील अनेक कुटुंबांना अशाच अनुभवांना सामोरे जावे लागत आहे. येथे कधीही न राहिलेले व्यक्ती आमचे पत्ते अर्जात नमूद करत आहेत. काहीजण तर बनावट भाडेकरारही सादर करत असल्याचे आढळून आले आहे.

रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, बनावट कागदपत्रांच्या मदतीने आधारकार्ड मिळवण्याचे प्रकार बहुधा स्थलांतरित कामगारांमध्ये आढळतात. तातडीने ओळखपत्र मिळवण्याच्या उद्देशाने ते असे मार्ग अवलंबत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. प्रत्येक नागरिकाला सरकारी सेवा मिळवण्यासाठी आधार आवश्यक आहे, हे समजते. मात्र, दुसऱ्याच्या पत्त्याचा गैरवापर करणे ही गंभीर बाब आहे, असे सामाजिक कार्यकर्त्या थेल्मा फर्नांडिस यांनी सांगितले.

पान २ ▶

# दोनापावल दरोडा प्रकरणाच्या तपासासाठी अनेक पथके स्थापन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २१ :** रविवारी पहाटे एका प्रतिष्ठित व्यावसायिक कुटुंबातील एका वृद्ध जोडप्याला नागाळी ( दोनापावल ) येथील त्यांच्या निवासस्थानी लुटल्याचा आरोप झाल्यानंतर, पोलिसांनी सांगितले की, या प्रकरणाचा तपास करण्यासाठी आणि आरोपींना लवकरात लवकर शोधण्यासाठी अनेक पथके तयार करण्यात आली आहेत.

चार ते पाच अज्ञात व्यक्तींनी नागाळी हिल्स, ( दोनापावल) येथील पीडितेच्या निवासस्थानी घुसून दागिने आणि रोख रक्कम लुटली. या संदर्भात, पणजी पोलिस ठाण्यात संबंधित कायद्याच्या कलमांखाली एफआयआर दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी आणि आरोपींना लवकरात लवकर शोधण्यासाठी गोवा पोलिसांच्या अनेक पथके तयार करण्यात आली आहेत, असे पोलिसांनी म्हटले आहे. नंतर पत्रकारांशी बोलताना गुन्हे शाखेचे पोलिस अधीक्षक राहुल गुप्ता म्हणाले, गोवा पोलिसांच्या विविध पथकांकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. जिल्हा पोलिस आणि गुन्हे शाखा दोन्ही त्यावर काम करत आहेत. दरम्यान, पोलिस महासंचालक (डीजीपी) आलोक कुमार, पोलिस महानिरीक्षक (आयजीपी) ओमवीर सिंग बिश्नोई, पोलिस उपमहानिरीक्षक (रेंज) वर्षा शर्मा, गुन्हे शाखेचे अधीक्षक राहुल गुप्ता आणि पणजीचे पीआय विजयकुमार चोडणकर यांनी घटनास्थळी भेट देऊन चौकशी केली. सुरक्षा रक्षकावर हल्ला करून तीन दरोडेखोर रात्री १२ ते पहाटे ४ च्या दरम्यान घरात घुसले. घुसखोरांनी ७७ वर्षीय पुरूष आणि त्यांच्या ७१ वर्षीय पत्नीला त्यांच्या बेडवर बांधले आणि लाखो रुपयांच्या मौल्यवान वस्तू चोरून नेल्या. दोघेही पती–पत्नी सुरक्षित आहेत तर त्यांच्या सुरक्षा रक्षकावर जखमी अवस्थेत रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पान २ ▶

# काँग्रेसकडून मंत्री गावडेंच्या राजीनाम्याची मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २१ :**काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि गोव्यातील काही प्रतिष्ठित कलाकारांच्या शिष्टमंडळाने गोवा राज्य कला अकादमीला भेट देत, नुकत्याच नूतनीकरणानंतर संस्थेमध्ये उद्भवलेल्या तांत्रिक आणि मूलभूत सुविधांतील त्रुटींवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. यावेळी शिष्टमंडळाने कला आणि संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांच्यावर टीका करत, त्यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा आणि अभिनेते शरद पोंक्षे तसेच इतर कलाकारांना 'सुपारीबाज' म्हणाल्याबद्दल सार्वजनिकरित्या माफी मागावी, अशी मागणी केली.

शिष्टमंडळाने सांगितले की, प्रसिद्ध वास्तुविशारद चार्ल्स कोरिया यांच्या संकल्पनेतून साकारलेली ही प्रतिष्ठित वास्तू नूतनीकरणामुळे आपल्या मूळ सौंदर्याचा आणि दर्जाचा सन्मान राखू शकलेली नाही. परिणामी, गोव्याचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर गमावले गेले असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.

सांताक्रूझ काँग्रेस समितीचे अध्यक्ष जॉन नाझरेथ यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, पूर्वी जेव्हा आम्ही कला अकादमीत कलाकार किंवा प्रेक्षक म्हणून यायचो, तेव्हा ध्वनीव्यवस्था अत्यंत दर्जेदार होती. प्रत्येक सूक्ष्म आवाज स्पष्ट ऐकू यायचा. मात्र, आता ध्वनीप्रणालीत मोठे दोष असून, मायक्रोफोनची क्षमता अत्यल्प झाली आहे. प्रेक्षकांनी अनुभव घेण्यासाठी पैसे मोजून येणे व्यर्थ ठरत आहे.

काँग्रेस नेते आणि वकील जितेंद्र गावकर यांनीही मंत्री गावडे यांच्यावर टीका करताना सांगितले की, एक कलाकार रंगमंचावर सादरीकरण करण्यापूर्वी

पान २ ▶

# पोप फ्रान्सिस यांचे निधन; ८८व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

## जगभरातील नेत्यांची श्रद्धांजली : साधेपणा आणि उदारमतवादी होती मुख्य ओळख

**व्हॅटिकसिटी, दि. २१ :**

पोप फ्रान्सिस यांचं सोमवारी (२१ एप्रिल) निधन झालं. कासा सँटा मार्टा या व्हॅटिकनमधील त्यांच्या निवासस्थानी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते ८८ वर्षांचे होते.कार्डिनल केविन फॅरेल यांनी पोप फ्रान्सिस यांच्या निधनाची घोषणा केली .

कार्डिनल केविन फॅरेल यांनी घोषणा केली की, प्रिय बंधू आणि भगिनींनो, मला आपल्या पवित्र फादर फ्रान्सिस यांच्या निधनाची घोषणा अत्यंत दुःखाने करावी लागते. आज सकाळी ( सोमवारी ) ०७:३५ वाजता, रोमचे बिशप फ्रान्सिस, पित्याच्या घरी परतले. त्यांचे संपूर्ण जीवन प्रभूच्या आणि त्यांच्या चर्चच्या सेवेसाठी समर्पित होते.

पोप फ्रान्सिस हे कॅथलिक चर्चमधील सुधारणांसाठी देखील ओळखले जातात. असे असूनही, पोप परंपरावाद्यांमध्येही लोकप्रिय होते. फ्रान्सिस हे दक्षिण अमेरिका (अर्जेंटिना) मधील पहिले पोप होते. रविवारीच, पोप फ्रान्सिस यांनी ईस्टर संडेच्या दिवशी व्हॅटिकनमधील सेंट पीटर्स स्क्वेअरवर सर्वांना संबोधित केले होते. पोप यांनी व्हीलचेअरवर बसून बाल्कनीतून लोकांना संबोधित केले आणि म्हणाले, प्रिय बंधू आणि भगिनींनो, तुम्हा सर्वांना ईस्टरच्या शुभेच्छा.

पोप फ्रान्सिस यांच्या निधनावर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. परमपूज्य पोप फ्रान्सिस यांच्या निधनाने खूप दुःख झाले. या क्षणी कॅथलिक समुदायाबद्दल मी मनापासून संवेदना व्यक्त करतो. पोप फ्रान्सिस यांना जगभरातील लाखो लोक कायम करुणा, विनम्रपणा आणि आध्यात्मिक धैर्याचे प्रतीक म्हणून स्मरणात ठेवतील. भारतातील लोकांविषयी असलेले त्यांचे प्रेम नेहमीच स्मरणात राहील. त्यांच्या आत्म्याला शांती मिळो, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.



पोप फ्रान्सिस यांच्या निधनाची बातमी समजताच जगभरातील नेत्यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी त्यांना श्रद्धांजली देताना म्हटले की, अतिशय विनम्र पोप फ्रान्सिस कायम दुबळ्या लोकांच्या पाठिशी उभे राहिले. तर पोप फ्रान्सिस यांच्या निधनाची बातमी दुःखद असल्याचे इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी म्हटले. ही बातमी खूप दुःख देणारी आहे. मला त्यांच्या मैत्रीचा आनंद मिळाला. त्यांनी जगाला एक नवीन मार्ग अवलंबण्याचं धाडस करण्याचं आव्हान केले. त्यांची शिकवण आणि वारसा वाया जाणार नाही. आम्ही दुःखद अंतःकरणाने या पवित्र आत्म्याला अभिवादन करतो. मात्र आम्हाला माहिती आहे की, ते आता प्रभूजवळ आहेत.

व्हाईट हाऊसने एक्स या सोशल मीडियावरील पोस्टमध्ये दिवंगत पोप फ्रान्सिस यांना श्रद्धांजली दिली आहे.पोप फ्रान्सिस यांच्या आत्म्याला शांती मिळो, असे पोस्टमध्ये म्हटले आहे. त्या सोबतच पोप फ्रान्सिस यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांची पत्नी मेलेनिया यांची भेट घेतल्याचा फोटो आहे. जे डी वेन्स पोप यांची भेट घेत असतानाचा आणखी एक फोटो देखील त्याबरोबर आहे.'मला अतिशय दु:ख होतं आहे', अशा शब्दांत अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे डी वेन्स यांनी श्रद्धांजली वाहिली आहे. जे डी वेन्स यांनी म्हटलं की, जगभरातील त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लाखो ख्रिश्चनांबद्दल मला दु:ख होतं आहे.

पोप फ्रान्सिस यांना 'आशा कशी निर्माण करायची हे माहिती होतं', अशा शब्दांत युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी पोप फ्रान्सिस यांना श्रद्धांजली वाहिली आहे.ते म्हणाले की, लोकांमध्ये आशा कशी निर्माण करायची, प्रार्थनेद्वारे दु:ख कसं कमी करायचं आणि एकात्मता कशी वाढवायची हे त्यांना माहीत होतं.झेलेन्स्की पुढे म्हणाले की, दिवंगत पोप फ्रान्सिस यांनी युक्रेन आणि युक्रेनमधील लोकांच्या शांततेसाठी प्रार्थना केली.युकेचे पंतप्रधान किएर स्टार्मर एक्स या सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये म्हणाले की पोप फ्रान्सिस यांच्या निधनाची बातमी ऐकून प्रचंड दु:ख झालं आहे.सर्वांसाठी न्याय्य असलेल्या जगासाठीचे त्यांचे अथक प्रयत्न, कायमस्वरुपी स्मरणात राहील. गरीब, शोषित आणि वंचितांसाठीचे पोप होते. युकेच्या लोकांच्या वतीनं मी संपूर्ण कॅथलिक चर्चकडे मनापासून माझ्या संवेदना व्यक्त करतो, असंही पंतप्रधान स्टार्मर म्हणाले.स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनीही पोप फ्रान्सिस यांना श्रद्धांजली वाहिली.

### पोप फ्रान्सिस यांचा शेवटचा संदेश

**धर्म, विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याशिवाय शांततेचा उपयोग नाही, असं मत पोप फ्रान्सिस यांनी त्यांच्या शेवटच्या संदेशामध्ये व्यक्त केलं आहे.पोप फ्रान्सिस यांचा ईस्टर संडेचा संदेश शांतता आणि इतरांच्या दृष्टिकोनाबद्दल आदर असा होता.पोप यांचा हा संदेश त्यांच्या वतीनं त्यांच्या एका सहाय्यकानं वाचून दाखवला. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की, धर्म, विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याशिवाय जगात शांतता असू शकत नाही.पोप यांनी त्यांनी शेवटच्या भाषणात गाझामधील लोकांचं, विशेषतः तिथल्या ख्रिश्चन समुदायातील लोकांचं स्मरण केलं. कारण युद्धामुळे मृत्यू आणि विनाश होतो आणि त्यातून मानवतावादी परिस्थिती दयनीय होते.पोप फ्रान्सिस यांनी जगभरात वाढत असलेला ज्यूविरोध चिंताजनक असल्याचंही म्हटलं.जगाच्या विविध भागांमध्ये सुरू असलेल्या अनेक संघर्षांमध्ये आपल्याला मृत्यूसाठी, हत्येसाठीची किती प्रचंड तहान दिसते आहे, असं ते म्हणाले.सर्व इस्रायली लोक आणि पॅलेस्टिनी लोकांच्या दु:खांबद्दल मी तीव्र संवेदना व्यक्त करतो. युद्धविराम व्हावा. ओलिसांची सुटका व्हावी आणि शांततामय भविष्याची आकांक्षा असलेल्या उपाशी लोकांना मदत मिळो,असं त्या संदेशात म्हटलं आहे.**